# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.04.2026** **वारः गुरुवार**

---

1. मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची विशेष बैठकीत विविध मंत्रालये, विभागांच्या उपाययोजनांचा पंतप्रधानांकडून आढावा.
2. खरीप हंगामासाठी खतं, बियाण आणि कृषी रसायनांचा देशात पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारचं प्रतिपादन
3. देशात जनगणनेला कालपासून सुरुवात, प्रथम स्वगणनेच्या पर्यायासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती.
4. अमेरिकेची सामरिक उद्दिष्ट्यपूर्ती निकट आल्याने सैन्य आपले काम पूर्ण करेल- डोनल्ड ट्रम्प
5. पश्चिम बंगालमध्ये मतदानोत्तर चाचण्यांवर पूर्णपणे बंदी आणि
6. महाराष्ट्रात समृद्धी महामार्गावर काल झालेल्या रस्ते अपघातात आठ महिला मृत्युमुखी

**<u>पंतप्रधान-बैठक</u>**

मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची विशेष बैठक काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. दिल्लीतील पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत विविध मंत्रालयं, विभागांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. तसंच आखाती देशांतील संघर्षपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भविष्यातील उपक्रमांविषयी चर्चा करण्यात आली. या संदर्भातील ही दुसरी बैठक होती. या बैठकीमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या अत्यावश्यक गरजांच्या उपलब्धतेचा आढावा घेतला. देशभरातल्या खत उपलब्धतेचा आढावा घेताना रबी आणि खरीप हंगामात खतांची उपलब्धतेच्या सुनिश्चिततेसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचाही आढावा घेतला. त्याचबरोबर, आखाती प्रदेशातील संघर्षाच्या परिस्थितीच्या परिणामांपासून नागरिकांचे संरक्षण करण्याचे प्रयत्न करण्याचे निर्देश पंतप्रधानांनी संबंधितांना दिले. अफवा किंवा चुकीची माहिती पसरवण्यास प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांपर्यंत वेळेवर आणि सुरळीत विश्वसनीय माहिती पोहोचवण्याची गरज मोदींनी अधोरेखित केली.

या बैठकीत अत्यावश्यक इंधन पुरठ्यातील स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी एलपीजी आणि एलएनजी पुरवठ्यातील फेरबदल, इंधन शुल्कात कपात आणि ऊर्जा क्षेत्रातील उपाययोजनांचाही आढावा घेण्यात आला. इंधन पुरवठा तसंच विजेची उपलब्धता याविषयी केलेल्या उपाययोजनांविषयी मंत्रिमंडळ सचिवांनी माहिती दिली. घरगुती वापरासाठीच्या एलपीजीचे दर स्थिर ठेवण्यात आले आहेत तसंच साठेबाजी आणि काळाबाजाराला पायबंद घालण्यासाठी गैरवापर प्रतिबंधक कारवाई केली जात आहे. त्यासह अत्यावश्यक वस्तू कायद्याच्या अंमलबजावणीबाबत राज्यांशी सातत्याने संवाद साधण्यासाठी नियंत्रण कक्षांची स्थापना करण्यात आली असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या बैठकीत, कृषी, खते, जहाजबांधणी, विमान वाहतूक, दळणवळण आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग या क्षेत्रांतील संभाव्य आव्हाने कमी करण्याच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

**<u>खरीप खते</u>**

दरम्यान, पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, देशभरात खरीप हंगामासाठी खतं, बियाण आणि कृषी रसायनांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं सरकारनं ठाम प्रतिपादन केलं आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे अतिरिक्त सचिव डॉ. मनिंदर कौर द्विवेदी यांनी काल आंतरमंत्रालयीन बैठकीत ही माहिती दिली. देशात खरीप पिकांच्या, 185 लाख क्विंटलपेक्षा अधिक बियाणांची उपलब्धता आहे, असं त्या म्हणाल्या. तर संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत विमानसेवांसाठीच्या एव्हिएशन टर्बाइन फ्युएलच्या दरांतील वाढ मर्यादित ठेवण्याच्या निर्णयाचे  नागरी विमान मंत्रालयाचे सचिव असान्गबा चुबा यांनी स्वागत केलं आहे.

**जनगणना**

देशाच्या जनगणनेला कालपासून सुरुवात झाली. यावेळी प्रथमच स्वगणनेचा पर्याय उपलब्ध असून यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वगणना अभियानात सहभागी होऊन या पोर्टलवर आपले तपशील नोंदवले. गृहसचिव गोविंद मोहन आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय  कुमार नारायण यावेळी उपस्थित होते. राज्यात 1 ते 15 मे या कालावधीत नागरिक या पोर्टलवर स्वतः माहिती भरु शकतील. प्रथम 34 प्रश्नांची माहिती भरून ती सादर केल्यानंतर नागरिकांना एक विशिष्ट ओळख क्रमांक मिळेल. तो जपून ठेवून 16 मे ते 14 जून या कालावधीत घरी येणाऱ्या जनगणना अधिकारी किंवा प्रगणक यांना तो द्यायचा
आहे.

**संसद अधिवेशन**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. राज्यसभेत आज आंध्र प्रदेश पुनर्रचना दुरुस्ती विधेयक 2026 पटलावर विचारविनिमयासाठी आणि मंजुरीसाठी मांडले जाण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा हा दुसरा टप्पा सुरू होता. यामध्ये अर्थ विधेयक 2026 आणि विनियोग विधेयक 2026 यांना मंजुरी मिळाली. तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही सभागृहांना संबोधित करत आखाती प्रदेशात सुरू असलेल्या संघर्षाच्या परिस्थितीवर सरकारची भूमिका स्पष्ट केली होती.

**ट्रम्प**

अमेरिकेची सामरिक उद्दिष्ट्यपूर्ती निकट आल्याने लवकरच अमेरिकेचे सैन्य इराणमधील आपले काम पूर्ण करेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. अमेरिकेत व्हाइट हाऊसमदून दूरचित्रवाणीवर प्रसारित भाषणात ट्रम्प यांनी ऑपरेशन एपिक फ्यूरीच्या माध्यमातून अमेरिकेने पूर्वीपेक्षा अधिक मोठा विजय मिळवला असल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांनी आपल्या वीस मिनिटांच्या भाषणात अमेरिकेला होर्मूझच्या सामुद्रधुनीची गरज नसल्याचा युक्तिवाद करतानाच मित्र राष्ट्रांना होर्मुझमधील जहाज वाहातूक सुरक्षित करण्याचे धैर्य दाखवण्याचे आवाहन केले. तसंच हे युद्ध संपताना अमेरिका अधिक सुरक्षित, अधिक सामर्थ्यवान आणि संपन्न असेल तसंच अणूहल्ल्याच्या धमकीच्या सावटातून अखेर मुक्त होईल असं म्हटलं आहे.

**अर्टेमिस मोहिम**

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने आर्टिमिस दोन या चंद्राभोवतीच्या पहिल्या मानवी मोहिमेला आज प्रारंभ केला. भारतीय प्रमाणवेळेनुसार आज पहाटे पावणे चारच्या सुमारास अमेरिकेतल्या फ्लोरिडाच्या केनेडी अवकाश केंद्रातून उड्डाण केले. दहा दिवसांच्या या मोहिमेत अंतराळवीर चंद्रावर प्रत्यक्ष उतरणार नाहीत मात्र आतापर्यंतच्या सर्वांत दूरच्या अंतरावरून प्रवास करत चंद्राभोवती प्रदक्षिणा घालण्याची योजना आहे. एका मिनीबसच्या आकाराच्या कॅप्सूलमधून अंतराळवीर प्रवास करतील.

**रशिया-उपप्रभार**

रशियाचे पहिले उपपंतप्रधान डेनिस मंतुरोव्ह आजपासून दोन दिवसांच्या भारत भेटीवर येत आहेत. या दौऱ्यात ते परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची हबेट घेतील. तसंच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचीही भेट घेतील.

**हनुमान जयंती**

देशभरात आज हनुमान जयंती उत्साहात साजरी केली जात आहे. पहाटे जन्मोत्सव साजरा केल्यानंतर भाविकांनी ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली आहे. आज विविध मंदिरांमध्ये हनुमान चालिसा, सुंदर कांड आणि अखंड रामायण यांचे पठणाचे आयोजन केलं जाते.

**शेतकरी ओळखपत्र**

देशातल्या 19 राज्यांतील जवळपास सव्वा नऊ कोटी शेतकरी ओळखपत्रे तयार झाली असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. विविध राज्यांच्या कृषी मंत्र्यांसमवेत झालेल्या एका आढावा बैठकीत चौहान यांनी ही माहिती दिली. या बैठकीत खतांचा साठा आणि काळाबाजार करणे या विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश चौहान यांनी राज्यांना दिले. विशिष्ट पिकांच्या खरेदीसाठी राज्यांना देण्यात आलेल्या मंजुरीविषयी बोलताना, शेतमालाची खरेदी वाजवी सरासरी गुणवत्ता निकष पूर्ण करणाऱ्या उत्पादनांपुरतीच मर्यादित असावी असे त्यांनी स्पष्ट केले.

**पश्चिम बंगाल एक्झिटपोल**

पश्चिम बंगालच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्यात मतदानोत्तर चाचण्या आयोजित करणे किंवा त्या प्रसिद्ध करणे अथवा त्याचा प्रचार करण्यास पूर्ण बंदी घालणारी अधिसूचना जारी केली आहे. ही बंदी मुद्रित, दूरचित्रवाणीसह सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांना लागू असेल. हे निर्बंध या महिन्याच्या सात तारखेपासून 29 तारखेपर्यंत लागू राहातील.

**जालना अपघात**

महाराष्ट्रात जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर काल सायंकाळी झालेल्या रस्ते अपघातात महामार्ग देखभाल दुरुस्तीचे काम करणाऱ्या आठ महिला मृत्युमुखी पडल्या. रोजंदारीचे काम संपवून टेम्पोजवळ उभ्या असणाऱ्या महिलांना मुंबईला जाणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने हा अपघात झाला. अपघातात पाच महिला आणि टेम्पो चालक जखमी झाला आहे. या अपघाताविषयी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची सानुग्रह मदत देण्याची घोषणा केली आहे.

**खेलो इंडिया**

छत्तीसगड इथं सुरू असलेल्या आदिवासी क्रीडा स्पर्धांच्या नवव्या दिवशी आज रायपूर इथं तिरंदाजीच्या स्पर्धा होणार आहेत. तर जगदलपूर इथं धावण्याच्या स्पर्धा होतील. महिलांच्या हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत काल ओडिशाने मिझोरमचा 1-0 ने पराभव करत सुवर्णपदक पटकावले. तर पुरुष हॉकी स्पर्धेत ओडिशाने झारखंडचा 4-1 असा पराभव केला. या स्पर्धांमध्ये कर्नाटक 21 सुवर्णपदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थानी आहेत.

**फीबा आशिया चषक**

सिंगापूरमध्ये झालेल्या पात्रता फेरीत तीन विजय मिळवून भारतीय पुरुष बास्केटबॉल संघानं फीबा आशिया चषक 2026 च्या मुख्य फेरीत आपल स्थान पक्क केलं. पात्रता फेरीच्या पूल-डी मध्ये बहरीन, कझाकिस्तान आणि हाँगकाँग ला पराभूत करून भारतानं मुख्य फेरीत धडक मारली. बास्केटबॉल मध्ये 83 व्या क्रमांकावर असलेल्या भारतानं आपल्या अंतिम पात्रता सामन्यात जागतिक क्रमवारीत 19 व्या स्थानावर असलेल्या बहारिनला 21-12 नं पराभूत करत उत्कृष्ट कामागिरी केली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.